दैनिक जनतेचे मत माझे मत
या वृत्तपत्रामध्ये जाहिरात
प्रकाशित करण्यासाठी
खालील नंबरवर संपर्क
साधावा.
संपर्क – ८८८८०११३१३



# जनतेचे मत माझे मत



मानसपुरे या दुकानात आधीच माल स्वस्त त्यात सेल लाऊन आजून मस्त
मानसपुरे
क्लॉथ अॅन्ड ड्रेसेस मेन रोड लोहा
सेल 50% ते 70%
डिस्काउंट
साडी,९वार,मेंन्स वेअर,शर्टिंग,शुटिंग,किड्स वेअर लेडीज वेअर



https://twitter.com/janteche?s=09 Jantechemat2015@gmail.com Janteche mat live https://youtube.com/c/JANTECHEMATLIVE

दैनिक । नांदेड । वर्ष ०७ वे । अंक - १९४ । बुधवार, दि.२८ सप्टेंबर २०२२ । RNI TC - MAHMAR45227 । पाने - ४ । किंमत ३ रू.

Dainik । Nanded । Year - 07 । Issue - 194 । Wednesday, Date: 28 September 2022 । RNI TC - MAHMAR45227 । Page - 4 । Price - 3


# शिंदे सरकारचा मराठा समाजासह अन्य प्रवर्गातील तरुणांना दिलासा

**मुंबई:** राज्य शासनाच्या विविध निवड प्राधिकरणांनी निवड आणि शिफारस केलेल्या मराठा (Maratha) समाजासह अन्य प्रवर्गातील सुमारे 1 हजार 64 उमेदवारांना अधिसंख्य पदांवरील नियुक्तीचे पत्र देण्यात येणार आहे.

त्यातील 78 उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरुपात आज मंत्रिमंडळ बैठक सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध विभागातील नियुक्तीपत्रे देण्यात आली. शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग (ESBC) प्रवर्गास सरळसेवेत 16 टक्के आरक्षणाचा निर्णय 2014 मध्ये झाला होता. त्यास उच्च न्यायालयाने नोव्हेंबर 2014 मध्ये स्थगिती दिली. 2018 मध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (ESBC) यास सरळसेवेत 13 टक्के आरक्षण देण्याचा कायदा करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने 9 सप्टेंबर 2020 रोजी या कायद्याला स्थगिती दिली होती. 5 मे 2021 रोजी सर्वोच्च न्यायलयाने हा कायदा रद्द केला.

## लॉकडाऊनमुळे थांबलेल्या उमेदवारांच्या पदांवर नियुक्त्या



न्यायालयीन स्थगिती, कोरोनामुळे असलेले लॉकडाऊन,२०१५ व २०२० या वर्षांत शासकीय पद भरतीला निर्बंध होते. मात्र २०१४ ते ९ सप्टेंबर २०२० या कालावधीत जी शासकीय पदभरती झाली त्यातील नियुक्तीकरिता शिफारस व पात्र उमेदवारांना न्यायालयीन स्थगिती आदेश, कोरोना लॉकडाऊनमुळे मराठा समाज तसेच अन्य प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्तीपत्र दिले नव्हते.

ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्तीबाबत कायदा समंत करण्यात आला. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात ८ सप्टेंबर २०२२ रोजी राजपत्र प्रसिद्ध केले आणि २१ सप्टेंबर २०२२ शासन निर्णय देखील जाहीर करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. अधिसंख्य पदांवर नियुक्ती देण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या १०६४ आहे. त्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग, महसुल व वन विभाग, कृषी, पदुम, वित्त, ग्रामविकास, नगरविकास, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, आदिवासी विकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह, राज्य उत्पादन शुल्क, शालेय शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, औषधी द्रव्ये विभाग अशा विविध विभागांमध्ये विविध संवर्गात त्यांना नियुक्ती देण्यात येणार आहे. त्यातील सर्वाधिक ७४३ उमेदवार हे ऊर्जा विभागातील आहे. महानिर्मिती, महावितरण यामधील ७४३ पैकी सुमारे ६० टक्के उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

# शिंदे सरकारला सुप्रीम कोर्टाचा दणका

; राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या निवडीला लागला ब्रेक




Shinde Fadnavis Government News : सुप्रीम कोर्टाने (Supreme Court) राज्यपाल नियुक्त बारा आमदारांच्या नियुक्ती करण्यावरून दणका दिला आहे. सुप्रीम कोर्टाने राज्यपाल (Governor) नियुक्त बारा आमदारांची नियुक्ती करण्यास मनाई केली आहे. या आधीच याप्रकरणी सुनावणी प्रलंबित असताना नवीन सरकार नव्याने बारा आमदारासाठी यादी बनवणार असल्याने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. सुनाणीनंतर कोर्टाने या प्रकरणी कोणतीही कारवाई शिंदे सरकारने करू नये असे आदेश देण्यात आले आहेत.

# अहमदपूर येथील प्रा.वसंत डावरे यांच्या राहत्या घरी जबरी चोरी

साडे तीन लाखांचा ऐवज लंपास, पोलिसांना आव्हान





अहमदपूर – अहमदपूर येथील अंबिका कॉलनी येथे राहणाऱ्या प्रा.वसंत रंगनाथ डावरे यांच्या राहत्या घरी दि.२६ सप्टेंबर २०२२ रोजी रात्रीच्या वेळी झोपेत असताना अज्ञात चोरट्यांनी झोपलेल्या हॉलला बाहेरून कोंडी लावून खिडकी दरवाजे उघडून चोरट्यांनी बेडरूममध्ये प्रवेश करून घरातील रोख रक्कम ५० हजार व १२ तोळे सोने असा एकूण ३ लाख ४७ हजार ६०० रूपयांचा ऐवज लुटल्याची घटना अहमदपूर येथील अंबिका कॉलनी येथे घडली आहे. या बाबत अहमदपूर पोलीस स्टेशनला प्रा.वसंत डावरे यांनी रितसर तक्रारी अर्ज दाखल केला असून याबाबत पुढील तपास पोलीस निरीक्षक करीत आहेत. परंतू या जबरी चोरीमुळे नागरीकांत प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच पोलीसांनी याबाबत सखोल चौकशी करून लवकरात लवकर आरोपीला अटक करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी नागरिकातून होत आहे. तसेच या चोरीचे पोलिसापुढे मोठे आव्हान असून याबाबत पोलिस यंत्रणा कोणत्या प्रकारे तपास करून जनतेच्या मनातील भिती कशी दूर करते याचीच चर्चा अहमदपूर शहरात होत आहे.

# जनावरांचा बाजार भरणाऱ्या ठिकाणी पोलिस तैनात

धुळे : लम्पी स्कीन आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनावरांचा बाजार भरविण्यावर बंदी आहे. तरी देखील आठवडे बाजार (Lumpy Disease) भरविला होता. यामुळे आजच्या आठवडे बाजाराच्या दिवशी गुरांचा बाजार भरू नये; याकरीता पोलिस (Police) तैनात करण्यात आले आहेत.

लम्पी स्कीन या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे (Dhule News) जिल्हा प्रशासनातर्फे जनावरांच्या खरेदी विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. असे असताना देखील गेल्या आठवड्यामध्ये मंगळवार या बाजाराच्या दिवशी वरखेडी रोड परिसरामध्ये अवैधपणे जनावरांचा बाजार भरवण्यात आला होता. या संदर्भात (Dhule Police) आझाद नगर पोलीस ठाण्यामध्ये याबाबत बाजार भरवणाऱ्यां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्याच पार्श्वभूमीवर आज देखील मंगळवारी गेल्या आठवड्याप्रमाणे जनावरांचा बाजार भरवला जाऊ नये; यासाठी पोलीस प्रशासनातर्फे सर्वतोपरी खबरदारी बाळगण्यात आली आहे,

पोलिस असल्याने शुकशुकाट

बाजार भरवल्या जाणाऱ्या ठिकाणी पोलीस प्रशासनातर्फे सकाळपासूनच पोलीस फौज फाटा तैनात करण्यात आला आहे. आझाद नगर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी देखील या ठिकाणी वेळोवेळी पाहणी करण्यासाठी पोहचत असल्यामुळे आज परिसरामध्ये जनावरांचा बाजार भरवणारे पोहोचले नसल्यामुळे शुकशुकाट बघावयास मिळत आहे.



# रायगडमध्ये एसटीचा भीषण अपघात

रायगड: रायगड जिल्ह्यातील (Raigad District) सुधागड तालुक्यात ब्रेकफेल झाल्याने एसटीचा भीषण अपघात झाला आहे. हा अपघात सुधागड तालुक्यातील महागाव फाट्यावरील सेरेनिटी फॉर्महाऊस जवळ झाला आहे. सदर एसटी (ST Bus) बस खेमवाडी पेण असा प्रवास करत असातना बसचा ब्रेक निकामी झाला आणि एसटी रस्त्याशेजारी फार्म हाऊसच्या संरक्षण भिंतीवर जाऊन आदळल्याची माहिती समोर आली आहे. शिवाय या बसचा अपघात झाला त्यावेळी बसमध्ये १३ प्रवासी प्रवास करीत होते. या प्रवाशांपैकी ७ प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे. जखमींवरती पाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात (Primary Health Center) उपचार सुरू आहेत. दरम्यान, एसटीच्या अपघातांमध्ये वाढ होत असून महामंडळाने बसच्या देखभालीकडे लक्ष देण्याची मागणी आता प्रवाशांकडून येत आहे.

पुण्यातील (Pune) आंबेगाव तालुक्यातील (Ambegaon) मुक्ताई प्रशाला पिंपळगावची स्कुलबस ४४ विद्यार्थ्यांना घेऊन गिरवली येथील आयुका दुर्बिण पाहण्यासाठी गेली होती. ती परत येत असताना एका वळणावर बस चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बस खोल दरीत कोसळल्याची धक्कादायक आज घडली आहे.

# ...म्हणून पंकजा मुंडेंना पालकमंत्री करा

; बहिण प्रीतम मुंडेंची जाहीर सभेत मागणी

बीड: जिल्ह्याचा (Beed) विकास करण्यासाठी, पंकजा मुंडेंना (Pankaja Munde) पालकमंत्री करा, अशी मागणी भाजपा खासदार आणि पंकजा यांच्या बहिण प्रीतम मुंडे यांनी जाहीर सभेत केली आहे. त्या अंबाजोगाई येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलतं होत्या.

त्यामुळे प्रीतम (Pritam Munde) यांच्या मागणीनंतर शिंदे-फडणवीस सरकार आता पंकजा मुंडे यांना मंत्रिपद देणार का? याकडे मुंडे समर्थकांचे लक्ष लागले आहे. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना वारंवार आमदारकी, मंत्रीपदाची संधी न दिल्याने कार्यकर्त्यांनी उघड उघड नाराजी व्यक्त केली आहे.





मात्र, आता चक्क पंकजा मुंडे यांच्या बहीण खासदार प्रीतम मुंडे यांनी देखील आपल्या बहिणीला मंत्रीपद न देल्याने उघड नाराजी व्यक्त केली आहे. तसंच शिंदे फडणवीस सरकारमध्ये पंकजा मुंडे यांना मंत्रिपद मिळावे, अस जाहीर कार्यक्रमात बोलून दाखवलं आहे.

पंकजाताईच पुन्हा जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून काम पहावं, अशी इच्छा देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली. पंकजाताई मागील पाच वर्ष बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असतांना, त्यांनी जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग आणले, रेल्वे आणली, मोठे उद्योग सुरू केले.

जिल्ह्याचा विकास करण्यासाठी हे महत्वाचे असते. त्यामुळे आता पुन्हा त्या बीडच्या पालकमंत्री झाल्या तर राहिलेला विकास सुद्धा पूर्ण होईल असं म्हणत प्रीतम मुंडे यांनी पंकजा मुंडेंना बीडच्या पालक मंत्री होण्याच्या शुभेच्छाही दिल्या.

# ...तर 'गिव्ह इट अप'साठी सक्ती करु

'त्या' रेशन कार्डधारकांना इशारा

Latur News : अन्न सुरक्षा योजनेच्या ( anna suraksha yojana) निकषात बसत नसलेल्या लाभार्थ्यांनी योजनेतून स्वतः बाहेर पडावे म्हणून 'गिव्ह इट अप' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उक्रमात सप्टेंबरअखेरपर्यंत सहभागी होऊन अन्न सुरक्षा योजनेतून स्वतःहून बाहेर पडावे अन्यथा शासनाच्या निर्देशानुसार निकषात बसत नसलेल्या रेशन (ration) कार्डधारकांवर (ration card) सक्तीने कारवाई करण्यात येईल असा इशारा लातूर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिला आहे.

"गिव्ह इट अप' या उपक्रमाला वारंवार मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानंतरही खोट्या माहितीच्या आधारे अन्न सुरक्षा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. रेशनच्या धान्याची गरज नाही किंवा उत्पन्न जास्तीचे आहे, अशा नागरिकांना रेशनचे धान्य बंद करुनही शिधापत्रिका चालू ठेवणे शक्य आहे.




रेशनवरील धान्य घेण्याची गरज नसेल तर, रेशनधारकांना अन्नधान्य अनुदानातून बाहेर पडता येईल. रेशनवरील धान्य बंद करण्यासाठी पुरवठा विभागाशी संपर्क करावा. धान्याचा हक्क सोडल्यास इतर गरजूंपर्यंत धान्य देता येईल, त्यामुळे गरज नसलेल्या रेशनकार्डधारकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सदाशिव पडदुने यांनी केले.

अन्नधान्याच्या अनुदानातून बाहेर पडण्यासाठी निरंतर मोहीम शासनाने हाती घेतली आहे. त्यामुळे गरज नसलेल्या नागरीकांनी किंवा उत्पन्न वाढलेल्या नागरिकांना रेशनवरील धान्य बंद करता येईल. अंत्योदय आणि दारिद्रय रेषेखालील रेशनकार्डधारकांनी खोटी माहिती देऊन धान्य घेत असल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधितांकडून धान्याची रक्कम शासनाच्या निर्देशानुसार वसुल करता येणार आहे. या अनुषंगाने शासन कधी काय निर्णय घेईल, हे सांगता येत नसल्याने निकषात बसत नसलेल्या रेशनकार्डधारकांनी स्वतःहून अन्न सुरक्षा योजनेतून बाहेर पडनेच योग्य होणार आहे.

# वन कर्मचाऱ्यांचा मुलगाच मुख्य सुत्रधार

बिबट्याची कातडी, निलगाय शिंग तस्करी प्रकरण

नाशिक : बिबट्याच्या कातडीसह चिंगारा व निलगायीच्या शिंग तस्करी प्रकरणातील धक्कादायक माहिती समोर आली आहे. अटक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये (Student) वन कर्मचाऱ्यांचा मुलगाच मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तर याप्रकरणी व कर्मचाऱ्यांची देखील खाते अंतर्गत चौकशी होणार आहे. अटक केलेले तिघही तरुणांची रवानगी नाशिक (Nashik) मध्यवर्ती कारागृहात झाली आहे.



वन कार्यालयातील वॉचमनचा मुलगा संशयित जॉन सुनील लोखंडे (वय २९, रा. वन वसाहत) याचीही रवानगी कारागृहात झाली आहे. आठ दिवसांच्या तपासात वन पथकाने बरेच मुद्दे संकलित केले असले, तरी चोरीची ही कातडी आणली कुठून याची उकल झालेली नाही. गंभीर बाब म्हणजे, वन कार्यालयाच्या वॉचमनचा मुलगा मुख्य सूत्रधार असूनही मूळ कारण अस्पष्ट आहे. अवघ्या पंधरा दिवसांत जिल्ह्यातून तीन टोळ्यांना (Leopard) बिबट्याच्या कातडीची तस्करीत अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यांत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. संशयित लोखंडेसह सिद्धांत मनोज पाटील (वय २१, रा. सर्वेश्वर कॉलनी, कॉलेजरोड) आणि रोहित एकनाथ आव्हाड (वय १९, रा. सातपूर) यांना या प्रकरणी अटक झाली.

# मोदींनी ठरवलं तरी मला संपवू शकत नाहीत

बीड : मोदींना वंशवादाचे राजकारण संपवायचे आहे. मी सुद्धा वंशवादाचे प्रतीक आहे. पण मला कोणी संपवू शकत नाही. जर मी तुमच्या मनात असेल तर.. असं म्हणत (Pankaja Munde) पंकजा मुंडे यांनी थेट मोदींना आव्हान दिले आहे.

नरेंद्र मोदी (Narendra Modi) यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सेवा पंधरवडानिमित्त बीड (Beed) जिल्ह्याच्या अंबाजोगाई येथे आयोजित "समाजातील बुद्धिजिवी लोकांच्या सोबत संवाद" या कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे बोलत होत्या. यावेळी खासदार प्रीतम मुंडे (Pritam Munde) यांची विशेष उपस्थिती होती.

वंशवादाचे राजकारण संपवायचेय

काँग्रेस पक्षात वंशवादाचे राजकारण सुरू आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वंशवादाचे राजकारण संपवायचे आहे. त्याचा अर्थ असा नाही की, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी एक क्षण विचार केला आणि यामध्ये मी सुद्धा वंशवादाचे प्रतीक आहे. मला कोणी संपवू शकत नाही, असं त्या म्हणाल्या.

मला कोणी संपवायचे झाले तर मला कोणीही संपवू शकत नाहीत. मोदीजींनी सुद्धा ठरवून मला संपवायचा प्रयत्न केला, तर ते सुद्धा मला संपवू शकत नाहीत. जर मी तुमच्या मनावर राज्य केले तर...., असंही पंकजा मुंडे म्हणाल्या.

## संपादकीय

# भारत जोडो; काँग्रेस तोडो?

काँग्रेससारखा प्रदीर्घ, उज्ज्वल परंपरा असणारा पक्ष इतक्या पोरकटपणे चालत असेल तर विरोधकांचे सकल ऐक्य साकारणा कसे आणि त्यात काँग्रेसला अध्वर्यू म्हणून कोण मान देणार, हा प्रश्नच आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार विरोधी ऐक्यासाठी बरेच झटत असून काँग्रेसला सोबत घ्यायला हवे, हा त्यांचा आग्रह चूक नाही.

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाचा जो खेळखंडोबा चालवला आहे; तो पाहिल्यावर या पक्षाला शत्रूची गरज आहे का, असाच प्रश्न कुणालाही पडेल. राजस्थान हे काँग्रेसच्या ताब्यात असणारे एकमेव मोठे राज्य आहे. आता अध्यक्षपदाच्या निमित्ताने ते सरकारही आवर्तात सापडावे, यासारखे पक्षाचे दुर्दैव नाही. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र या राज्यांतली पुरती किंवा आघाडीतील सत्ता आधीच गेली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, महाराष्ट्र या मोठ्या राज्यांमधून काँग्रेसची सतत पीछेहाट होते आहे. अशावेळी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांना अस्थिर किंवा नाराज करून काँग्रेस पक्षश्रेष्ठ नेमके काय साधणार आहेत? एकीकडे, नितीश कुमार, लालूप्रसाद यांच्यासारखे विरोधी पक्षांचे नेते सोनिया गांधी यांना भेटून विरोधी ऐक्यासंबंधी बोलणी करीत आहेत. दुसरीकडे, पक्षाचा संभाव्य अध्यक्ष म्हणून नाव चर्चेत असणाऱ्या नेत्याचेच पाठीराखे केंद्रीय पक्षनेत्यांना बंडाचे निशाण दाखवतात. 'ही बंडाळी आपणास माहीत नव्हती आणि जे झाले त्याबद्दल मी माफी मागतो,' असे राजस्थानाचे मुख्यमंत्री अशोक गहलोत म्हणाल्याचे मध्यस्थ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या हवाल्याने आता सांगितले जाते.

गहलोत यांच्या या विधानावर शाळकरी मूलही विश्वास ठेवणार नाही. 'आमचा मुख्यमंत्री बदलाल किंवा आम्हाला हवा तो विधीमंडळ नेता न द्याल तर खबरदार,' असा इशारा ९० आमदार पक्षश्रेष्ठांना देतात आणि ते मुख्यमंत्र्याला माहीतही नसेल; तर असा कुचकामी नेता पक्षाचा केंद्रीय अध्यक्ष म्हणून काय दिवे लावणार? गांधी कुटुंबीयांना पक्षात सत्तापद नको आहे; मात्र, पक्षाची खरी, आंतरिक सत्ता सोडायची नाही, हा जबरदस्त विरोधाभास हेच या साऱ्या समस्यांचे मूळ कारण आहे. उद्या सोनिया, राहुल किंवा प्रियांका यांचे आदेश ऐकत ऐकतच नामधारी अध्यक्षपद सांभाळायचे असेल तर त्यापेक्षा जयपूरची सुभेदारी परवडली, असे गहलोत यांना वाटल्यास नवल नाही.

काही दिवसांपूर्वी 'एक नेता एक पद' ही चर्चा सुरू झाली, तेव्हाच संभाव्य कटकटींचा सुगावा लागला होता. लहर येईल तेव्हा नर्मदा परिक्रमा करायची आणि लहर असेल तेव्हा पक्षांतर्गत आगीत तेल टाकायचे, असे वागणाऱ्या दिग्विजय सिंह यांनी याची सुरुवात केली. मागे राजस्थानात बंडाळी झाली, तेव्हा पक्ष सोडून चाललेल्या सचिन पायलट यांना म्हणे पक्षश्रेष्ठांनी (म्हणजे कोण?) थांबविले आणि मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन दिले. ते पुरे करण्याची वेळ आली आहे, असे काँग्रेस अध्यक्षांना आता वाटू शकते. पण पायलट यांच्या मागे धड दहा आमदारही नाहीत. मग लोकनेते असणाऱ्या गहलोत यांना नाराज करण्याची हिंमत पक्षश्रेष्ठ कशाच्या बळावर करतात? चंद्रशेखर यांच्या 'भारत पदयात्रे'प्रमाणे राहुल यांची पदयात्रा देशात परिवर्तनाचे वादळ पेरत आहे, असा भ्रम तर कुणाला झालेला नाही ना? राहुल यांची इतकी पकड पक्षावर असती तर आमदार 'आम्हाला नेता म्हणून फक्त गहलोत माहीत आहेत,' असे म्हणू तरी शकले असते का?

काँग्रेससारखा प्रदीर्घ, उज्ज्वल परंपरा असणारा पक्ष इतक्या पोरकटपणे चालत असेल तर विरोधकांचे सकल ऐक्य साकारणा कसे आणि त्यात काँग्रेसला अध्वर्यू म्हणून कोण मान देणार, हा प्रश्नच आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार विरोधी ऐक्यासाठी बरेच झटत असून काँग्रेसला सोबत घ्यायला हवे, हा त्यांचा आग्रह चूक नाही. मात्र, 'काँग्रेसच्या पक्षाध्यक्षपदाची प्रक्रिया एकदा पुरी होऊ दे. मग विरोधकांच्या आघाडीचे पाहू,' असे सोनिया गांधी म्हणाल्या, असे म्हणतात. याचा अर्थ, त्यांना पक्षाध्यक्षपदाचा प्रश्न मनाजोगता आणि लवकर मार्गी लागेल, असा विश्वास वाटत नसावा. आज देशभरात विरोधकांच्या ऐक्याचे विविध प्रयत्न चालू असून प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव, आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी हे काँग्रेस पक्षाला सोबत घेण्यास फारसे उत्सुक नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रात काँग्रेसची केलेली कोंडी नवी नाही. हरयाणात दिवंगत नेते देवीलाल यांच्या जयंतीनिमित्त ओमप्रकाश चौटाला यांच्या मेळाव्यात शरद पवार, नितीश कुमार, सुखबीर बादल हे होते; पण काँग्रेसला साधे निमंत्रणही कुणी दिले नाही. अशावेळी ज्या राज्यांमध्ये सत्ता आहे, ती सामंजस्याने टिकवायला हवी, हे शहाणपण शिकवायला कुण्या चाणक्याची गरज नाही. रोम जळताना नीरो फिडल होता; तसे राहुल गांधी जयपूरमध्ये पक्षाला आग लागली असताना दक्षिणेत पदयात्रा करीत आहेत. त्यांनी पदयात्रा जरूर करावी. पक्ष बळकट करायला हवा. पण आणीबाणी कोणती आणि दीर्घकालीन व्यूहरचना कोणती, याचा विवेक नको का? असे दिशाहीन विरोधक असल्यावर सत्ताधाऱ्यांच्या वर्तनात उन्माद आला तर दोष कुणाला द्यायचा?

# प्रादेशिक नेते राज्यांपुरतेच सीमित

काँग्रेसला पर्याय ठरण्याचा चंद्रशेखर राव यांचा प्रयत्न दिसतो, मात्र आजवरचा इतिहास पाहता हे आव्हान खडतरच म्हणावे लागेल!

तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि तेलंगणा राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांनी पुढील महिन्यात राष्ट्रीय पक्ष स्थापन करण्याचे सूतोवाच केले आहे. २०२४ च्या निवडणुकीत भाजपला पर्याय म्हणून आपला पक्ष रिंगणात उतरविण्याची त्यांची योजना असून तसे संकेत दिले जात आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात अनेक प्रादेशिक पक्ष स्थापन झाले. त्यांनी त्या त्या राज्यांची सत्ता भूषविली किंवा त्या राज्यातील प्रमुख पक्ष म्हणून उभे राहिले. परंतु एकाही प्रादेशिक पक्षाला राष्ट्रीय पातळीवर ठसा उमटविता आलेला नाही. प्रादेशिक पक्षांचे नेते त्या राज्यांपुरेतच सीमित राहिले.

गेली आठ वर्षे तेलंगणाचे मुख्यमंत्रीपद भूषविणारे चंद्रशेखर राव यांनी गेल्या काही दिवसांत भाजपच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली. वास्तविक आधी त्यांची भूमिका भाजपला अनुकूल होती. पण तेलंगणात सत्ता खुणावू लागताच भाजप नेतृत्वाने चंद्रशेखर राव यांची कोंडी करण्यास सुरुवात केली. तांदूळ खरेदीच्या मुद्द्यावर तेलंगणा सरकार आणि तेलंगणा राष्ट्र समितीची कोंडी झाली. यातूनच चंद्रशेखर राव हे भाजपच्या विरोधात गेले. विरोधी एवढा टोकाचा झाला की त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या वेळी हैदराबाद विमानतळावर स्वागतासाठी उपस्थित राहणे दोनदा टाळले. भाजपच्या नेतृत्वाने चंद्रशेखर राव व त्यांच्या घराणेशाहीला लक्ष्य केले आहे. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत चंद्रशेखर राव यांचा पराभव करण्याची भाजपची योजना आहे. ती प्रत्यक्षात येईल का, हे नंतर स्पष्ट होईल. पण चंद्रशेखर राव हे अधिक सावध झाले आहेत. सत्ता



टिकविण्याचे आव्हान असताना त्यांना राष्ट्रीय पातळीवर भूमिका बजाविण्याचे स्वप्न पडू लागले आहे. त्यासाठीच ते दसऱ्याच्या मुहूर्तावर राष्ट्रीय पक्षाची घोषणा करणार आहेत.

तेलंगणा राष्ट्र समितीच्या धर्तीवर 'भारत राष्ट्र समिती' या नवीन पक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. या पक्षाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर पक्ष वाढविण्याची त्यांची योजना आहे. आंध्र प्रदेशात तेलुगू बिड्डा किंवा अस्मितेच्या मुद्द्यावर प्रादेशिक पक्षाची मुहूर्तमेढ रोवणारे तेलुगू देशमचे संस्थापक व माजी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी राष्ट्रीय पातळीवर स्वतःचा पक्ष वाढविण्याची योजना आखली होती. त्यासाठी त्यांनी भारत देशम या पक्षाची घोषणाही केली होती. भारत देशम हा पक्ष तिसरी आघाडी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावेल, असे त्यांनी जाहीर केले होते. पण एन. टी. रामाराव त्यांचे राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करण्याचे स्वप्न साकारू शकले नाहीत. या पार्श्वभूमीवर दुसरे तेलुगू नेते चंद्रशेखर राव यांचा प्रयत्न कितपत यशस्वी होईल याबाबत साशंकता व्यक्त केली जाते. रामाराव यांचे जावई व तेलुगू देशमचे सध्याचे नेते चंद्राबाबू नायडू यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समन्वयक म्हणून भूमिका पार पाडली असली, तरी त्यांच्या नेतृत्वाला मर्यादा होत्याच.

राष्ट्रीय पातळीवर स्वतःचे नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी चंद्रशेखर राव यांनी विविध राज्यांचा दौरा केला. शेतकरी कायद्यांच्या विरोधातील आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तेलंगणा सरकारच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. आपले नेतृत्व समाजातील सर्व घटकांमध्ये सर्वमान्य व्हावे, असा त्यांचा प्रयत्न होता. चंद्रशेखर राव यांनी मुंबईचा दौरा केला. दौऱ्यात त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. पण ठाकरे यांनी चंद्रशेखर राव यांना जाहीरपणे पाठिंबा देणे टाळले. मुंबई भेटीत चंद्रशेखर राव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांचीही भेट घेतली होती. या भेटीत राजकीय चर्चा झालीच नाही, असे ट्वीट करून शरद पवार यांनी चंद्रशेखर राव यांच्या राष्ट्रीय योजनेची हवाच काढून घेतली होती. ममता बॅनर्जी, स्टॅलिन, जगनमोहन आदींची त्यांनी भेट घेतली. ममता बॅनर्जी यांचीही राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व प्रस्थापित करण्याची महत्त्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. अशा वेळी ममतांकडून पाठिंबा मिळण्याची शक्यताच नव्हती. काँग्रेस तर चंद्रशेखर राव यांना जवळही करण्यास तयार नाही. चंद्रशेखर राव यांची चौधरी चरणसिंह, देवीलाल या माजी पंतप्रधान वा उपपंतप्रधानांसारखी प्रतिमाही अद्याप तयार झालेली नाही.

तेलंगणाच्या बाहेर त्यांचे नेतृत्व अजून तरी मान्य झालेले नाही. अगदी शेजारील आंध्र प्रदेश या तेलुगू भाषक राज्यातही चंद्रशेखर राव यांचे नेतृत्व स्वीकारले जाणे कठीणच आहे. आंध्र प्रदेशचे विभाजन चंद्रशेखर राव यांच्यामुळे झाले, हा राग तेथील नागरिकांमध्ये आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात भाजप, शिवसेना, आता शिंदे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी, मनसे असे विविध प्रस्थापित पक्ष असताना चंद्रशेखर राव यांच्या पक्षाचा स्वीकार होणे कठीणच दिसते. अगदी तेलंगणाच्या सीमेवरील राज्यांतील नागरिकांमध्ये मेडीगड्डा धरणाच्या बांधकामावरून संतप्त भावना आहेत. उत्तर भारतात तर दक्षिण भारतातील प्रादेशिक नेत्याचे नेतृत्व स्वीकारले जाणे महाकठीण. कारण दक्षिणेकडील नेतृत्व कधीच उत्तरेत प्रस्थापित होत नाही. अगदी हैदराबादचे एमआयएमचे ओवेसी यांना उत्तर प्रदेश वा बिहारमधील मुस्लिमांमध्ये स्वतःचे नेतृत्व प्रस्थाापित करण्यात अद्याप यश आलेले नाही.

देशातील विविध प्रादेशिक नेते त्या त्या राज्यांपुरतेच सीमित राहिले होते. समाजसुधारक किंवा द्रमुकचे संस्थापक पेरियार हे तमिळनाडूपुरतेच मर्यादित राहिले. प्रकाशसिंह बादल, सुरजितसिंह बर्नाला आदी अकाली नेते पंजाबच्या बाहेर कधी पडले नाहीत. दक्षिणेत पेरियार, अण्णादुराई, एम. जी. रामचंद्रन, करुणानिधी, जयललिता, शिवाजी गणेशन, चिरंजीवी असे विविध प्रादेशिक नेते झाले. वा त्यांचा त्या त्या राज्यांमध्ये झंझावात होता. पण राष्ट्रीय पातळीवर कोणीच प्रभाव टाकू शकले नाही. माजी पंतप्रधान देवेगौडा किंवा देवराज अर्स हे कर्नाटकातील नेते राष्ट्रीय पक्षांमुळे राष्ट्रीय पातळीवर चमकले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आक्रमक हिंदुत्वाबद्दल उत्तर भारतात आकर्षण होते. पण बाळासाहेबांचे नेतृत्व उत्तरेत कधीही स्वीकारले गेले नाही वा स्वतः बाळासाहेबांनी त्या दृष्टीने प्रयत्नही केले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा असला तरी शरद पवार यांचे नेतृत्व महाराष्ट्राबाहेर फारसे स्वीकारले गेले नाही. सोनिया गांधी यांच्या विदेशी असण्याचा मुद्दा उपस्थित करत पवारांनी काँग्रेसमध्ये बंड केले. तेव्हा पवारांना देशात सर्वत्र चांगला पाठिंबा मिळेल, अशी अपेक्षा होती. पण काँग्रेसमधील अन्य नेत्यांचे तेवढे पाठबळ मिळाले नाही वा राष्ट्रीय पातळीवर त्यांची प्रतिमाही निर्माण झाली नाही. पवार १९९१ मध्ये पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले होते. पण तेव्हाही काँग्रेसच्या खासदारांमध्ये पवारांच्या नावावर सहमती झाली नव्हती.

राष्ट्रीय पातळीवर प्रादेशिक नेतृत्वाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. काँग्रेस कमकुवत झाल्याने आपला पर्याय असावा, असा चंद्रशेखर राव यांचा प्रयत्न दिसतो. पण ती जागा व्यापण्यासाठी आम आदमी पार्टीचे नेते व दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे देशभर भ्रमण करत आहेत. परिणामी चंद्रशेखर राव हे नव्याने प्रयत्न करीत असले तरी आतापर्यंतचा इतिहास लक्षात घेता तेलंगणाच्या या नेत्यासमोर स्वतःचे नेतृत्व प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान असेल.

# ब्राझीलमध्ये नेतृत्वाच्या प्रवृत्तींची लढत

जगात आकारानं पाचवा आणि लोकसंख्येनुसार सातवा क्रमांक लागणाऱ्या ब्राझीलमधली अध्यक्षीय निवडणूक तोंडावर आली आहे. २ ऑक्टोबरला या लढतीतील पहिली फेरी होणार आहे. दोन वेगवेगळ्या शक्ती समोरासमोर येत आहेत. जनमत चाचण्यांमध्ये डाव्या आघाडीचे लुईस इनासिओ लूला द सिल्वा (थोडक्यात: लूला) सतत कमीजास्त फरकाने आघाडीवर आहेत; तर कट्टर उजवे जाइर बोल्सोनारो काहीसे मागे पडले आहेत.

राजकारणात येण्यापूर्वी १९७७ पासून १७ वर्ष जाइर बोल्सोनारो लष्करात होते. तिथे ते कॅप्टनच्या हुद्द्यापर्यंत पोहोचले होते. १९६४ ते १९८५ हा काळ ब्राझीलमध्ये लष्करशाहीचा, त्यापैकी सात-आठ वर्ष बोल्सोनारो लष्करात होते. 'लष्करी राजवटीत लोकांचा छळ झाला पण तिने पुरेशी माणसं मारली नाहीत,' हे त्यांचं जाहीर मत आहे. ते २०१८ च्या निवडणुकीत 'अलायन्स फॉर ब्राझील' पक्षाचे उमेदवार म्हणून अध्यक्षपदासाठी उभे राहिले. हा पक्ष त्यांच्या मते 'परंपरावादी मूल्यं मानणारा, राष्ट्रवादी, सर्व धर्मांचा आदर करणारा, स्व-संरक्षणाचा अधिकार मानणारा, त्यासाठी शस्त्रास्त्रं बाळगणं आवश्यक आहे असं मानणारा, जगाबरोबर मुक्त व्यापार करू इच्छिणारा' होता. यातल्या गोंडस शब्दांच्या मागे असलेलं वास्तव लक्षात घेऊन ब्राझीलमधल्या माध्यमांनी त्यांच्या पक्षाचं वर्णन 'अति-उजवा आणि लोकैकवादी (पॉप्युलिस्ट) पक्ष' या शब्दांत केलं होतं.

बोल्सोनारोंच्या निवडणूक प्रचारात आधी लूला आणि नंतर अध्यक्ष झालेल्या डिल्मा रूसेफ यांच्या काळातील भ्रष्टाचार, गुन्हेगारी, आर्थिक दुरवस्था हे महत्त्वाचे मुद्दे होते. हे सगळे मुद्दे घेऊन प्रचार करतानासुद्धा बोल्सोनारोंच्या भाषणांत वर्णभेद, लिंगभेद, भांडवलधार्जिणेपणा, मूळनिवासी टोळ्यांबद्दल तिरस्कार, पर्यावरणाबद्दल बेफिकिरी या सगळ्याचं पुरेपूर दर्शन होत होतं. अगोदरच्या डाव्या शासनातल्या भ्रष्टाचाराचे बरेच तपशील बाहेर आले होते आणि जनतेत त्याबद्दल नाराजी होती. आपण स्वच्छ शासन देऊ असं बोल्सोनारो म्हणत होते. त्याच्यावर विश्वास ठेवून मतदारांनी बोल्सोनारोंच्या बाजूने कौल दिला.

जानेवारी २०१९ मध्ये बोल्सोनारोंच्या कारकीर्दीला सुरुवात झाली. पण एकूणच बोल्सोनारोंचा इतिहास आणि त्यांच्या प्रचारातले मुद्दे पाहून अनेकांना ब्राझीलची काळजी वाटत होती. आपल्या बेताल बडबडीमुळे आणि त्यांच्या डोक्यातल्या बेजबाबदार योजनांमुळे त्यांना 'दक्षिणेकडचे ट्रम्प' म्हणूनच दुनिया ओळखू लागली होती. पर्यावरणाविषयी अनास्थेत तर ते कधी कधी डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा एक पाऊल पुढेच दिसायचे. बोल्सोनारोंची अध्यक्षीय कारकीर्द सुरू झाली. ब्राझीलच्या हद्दीत येणाऱ्या ॲमेझॉन जंगलक्षेत्रात ऑगस्ट २०१९ च्या दरम्यान अचानक मोठ्या प्रमाणात वणवे लागल्याचं दिसू लागलं. एकूण क्षेत्रफळ ५५ लाख चौरस किमी असलेल्या ॲमेझॉनच्या अरण्याचा ६० टक्के भाग म्हणजे सुमारे ३३ लाख चौ. किमी. ब्राझीलच्या हद्दीत येतो. हा आकार आपल्या देशाच्या (भारताच्या) सुमारे ८२ टक्के एवढा आहे. जगाचं फुप्फुस म्हटलं जाणारं ॲमेझॉनचं जंगल, जगात एकूण जेवढा कार्बन डायऑक्साइड वायू तयार होतो त्यापैकी सुमारे वीस टक्के वायू ॲमेझॉनचं जंगल शोषून घेतं. या अरण्यातील वणव्यांच्या संख्येत २०१८ सालापेक्षा ८० टक्क्यांनी वाढ झाली. या आगींकडे बोल्सोनारो जाणीवपूर्वक काणाडोळा करत आहेत असं अनेकांना वाटत होतं. शेतकरी, पशुपाल, बीफची विक्री करणारे, खाणवाले यांच्या लॉबीज सतत बोल्सोनारोंची पाठराखण करत असतात. त्यांना मतं मिळवून देतात.

ब्राझीलच्या जंगलक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर घोटाळे सुरू आहेत. अवैध लाकूडतोडही कमीजास्त प्रमाणात सर्वच जंगलक्षेत्रांत होत असते. पण जंगल- रक्षणासाठी असलेल्या निधीमध्ये बोल्सोनारोंनी कपात केली. त्यांच्यापूर्वीच्या डाव्यांवर याबाबतीत बोल्सोनारो टीकेची झोड उठवत असतात. डाव्या आघाडीच्या शासनांचं जंगलतोड आणि खाणकामाला विरोध करण्याचं धोरण कसं व्यापारविरोधी ऊर्फ अव्यवहार्य होतं असा बोल्सोनारोंच्या टीकेचा मथितार्थ असतो. आणि डाव्यांच्या या 'व्यापारविरोधी' धोरणाला बोल्सोनारोंचा उपाय काय असेल? तर इथलं खाणकाम वैध करून टाकणं. तसा प्रस्ताव बोल्सोनारो संसदेत आणू पाहात होते. त्याआधीच, अमेझॉनमध्ये लाकूडतोड करून तिथे सोनं शोधणाऱ्या बाहेरून आलेल्या लोकांनी आपापले सुमारे २० हजार अवैध कॅम्प उभे केले आहेत.

बोल्सोनारोंच्या बेताल बडबडीबद्दल एक स्वतंत्र लेखच लिहिता येईल. एखाद्या महिलेचा अवमान करण्यासाठी ते तिला 'बलात्कारास अयोग्य' ठरवतात, 'मला चार मुलगे आहेत; पण पाचव्या वेळी मी कमजोर पडल्यामुळे मुलगी निपजली' असे जाहीरपणे सांगतात आणि समलिंगी, ट्रान्सजेंडर किंवा तत्सम व्यक्तींबद्दल त्यांना मुळीच आस्था नाही. त्यांचा वंशवाद त्यांच्या विविध वक्तव्यांमध्ये डोकावत असतो.

करोनाच्या काळात बोल्सोनारोंनी कायम अज्ञानावर आधारित बडबड केली. करोनाविषाणू हा फ्लूचाच कुठलातरी नवा प्रकार आहे; त्यात थंडी वगैरे वाजते; त्यात विशेष लक्ष देण्यासारखं काही नाही असा बोल्सोनारोंचा सुरुवातीचा आविर्भाव होता. पण जेव्हा करोनाचं संकट अधिकाधिक गहिरं होत गेलं तसं त्यांनी जनतेला आवाहन केलं : या संकटाला एखाद्या मर्दासारखे भिडा; लहान पोरासारखं वागू नका. आपल्याला केव्हातरी मरायचंच आहे. तेव्हा न घाबरता कामावर जा. ब्राझीलमधल्या एकूण २७ पैकी २० राज्यांनी बोल्सोनारोंच्या प्रयत्नांना धुडकावून सरळ लॉकडाऊन लागू केला. यात बोल्सोनारोंच्याच पक्षातले गव्हर्नरसुद्धा होते. एक प्रकारे बोल्सोनारोंच्या विरुद्ध ही राजकीय बंडखोरी होती. ब्राझीलमधली जनता २५ मार्च २०२० ला रात्री भांडी आणि थाळ्या वाजवत होती. पण या वादनासोबत 'बोल्सोनारो, चले जाव' अशा घोषणा लोक आपापल्या घरांतून देत होते.

एकदा बोल्सोनारोंना, हायड्रोक्सीक्लोरोक्वीन हे मलेरियावरचं औषध हा करोनावर रामबाण उपाय आहे याचा ट्रम्प महाशयांप्रमाणे साक्षात्कार झाला. आणि ते आपल्याला मिळालंच पाहिजे असा आग्रह त्यांनी आपल्या भारताकडे धरला. वास्तविक हे औषध मलेरियावरचं. ते करोनासाठी एकमेव आणि रामबाण औषध नव्हे; ते अनेक औषधांपैकी एक आहे; ते अत्यंत विचारपूर्वक दिलं पाहिजे वगैरे माहीत असूनही हा हट्ट त्यांनी धरला होता.

जानेवारी २००३ मध्ये लूलांची राजवट सुरू झाली. पुढे २०१० पर्यंत ते ब्राझीलचे अध्यक्ष होते. ते सत्तेवर आले त्या वेळी त्यांना प्रशासकीय अनुभव नव्हता. शिवाय त्यांचा डावीकडे असलेला कल आणि कामगारवर्गीय पार्श्वभूमी लक्षात घेता त्यांच्याकडून नेमकी काय अपेक्षा करायची याबद्दल सर्वांच्या मनात साशंकता होती. त्यांच्या आर्थिक धोरणांमध्ये ते कोणते बदल करतील हे काहींना समजत नव्हतं. त्यांचं परराष्ट्रीय धोरण कसं असेल; परदेशातून येणाऱ्या भांडवलाबद्दल त्यांची काय भूमिका असेल याबद्दल संदिग्धता होती. त्यांच्या कार्यकाळात एकूण १.३ कोटी नवे रोजगार निर्माण झाले. लूलांच्या कार्यकाळात ब्राझीलच्या परदेशी व्यापारात वाढ झाली; शिवाय आयात-निर्यातीतली शेष रक्कम १३१० कोटी डॉलर वरून ३३३० कोटी डॉलपर्यंत पोहोचली. आर्थिक वृद्धीचा दर १.९ टक्क्यांवरून ५.२ टक्क्यांपर्यंत गेला. अर्थातच यामुळे दारिद्र्य निवारणाचे कार्यक्रम राबवणं लूलांना शक्य झालं. या त्यांच्या कामांमुळे लूलांची लोकप्रियता बरीच वाढली. २०१८ साली ब्राझीलमध्ये जेव्हा रीतसर निवडणुका झाल्या. त्या वेळी तुरुंगात असूनसुद्धा लूला त्यांच्या काळातल्या कामगिरीमुळे जनतेत सर्वात लोकप्रिय होते. जनमताच्या चाचण्यांत ते आघाडीवर होते. ते निवडून येऊ शकले असते. पण तेव्हा ते तुरुंगात असल्याने ब्राझीलच्या कायद्याप्रमाणे ते निवडणूक लढवू शकले नाहीत.

वर्कर्स पार्टीला तिच्या पक्षाच्या सत्तेतल्या मंत्र्यांनी केलेले भ्रष्टाचार महागात पडले. अर्थातच २०१८ च्या निवडणुकीत त्याचा फायदा कट्टर उजव्या बोल्सोनारोंना मिळाला आणि ते निवडून आले. मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मतदारांत आज २०२२ सालातसुद्धा लूलांच्या आघाडीबद्दल काही नाराजी आहे आणि वर्कर्स पार्टीला मतदान करताना मतदार काहीसे साशंक आहेत. तरीही जनमत चाचण्यांत लूला आघाडीवर आहेत. लूलांच्या पहिल्या अध्यक्षपदाच्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेतील कच्च्या मालाचा बाजार तेजीत होता. ब्राझीलला त्यातून मिळालेल्या उत्पन्नामुळे दारिद्र्य निवारणाचं काम त्या मानानं सोपं होतं. पण आज अशी परिस्थिती राहिलेली नाही. जे निवडून येतील त्यांच्यासाठी परिस्थिती पूर्वीइतकी सुकर नाही. उद्या लूला निवडून आले तरी ते आजच्या परिस्थितीत जनतेचा विश्वास कायम राखण्याचं त्यांच्यासमोर आव्हान आहे. आज लॅटिन अमेरिकेतल्या मेक्सिको, पेरू, चिले, व्हेनेझुएला, कोलंबिया, बोलिव्हिया, होंडुरास, निकाराग्वा, अर्जेटिना या देशांतल्या जनतेने डावीकडे झुकलेल्या शासनांना आपली पसंती दिली आहे. (अमेरिकेत दुसरी 'पिंक टाइड' येते आहे असं तिचं वर्णन केलं जातं. पहिली 'पिंक टाइड' १९९८ पासून सुमारे २०१४ सालापर्यंत होती. २०२० पासून पुन्हा दुसऱ्या पिंक टाइडचं उधाण येत आहे.) अर्थव्यवस्थेचा आकार, लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या तिन्ही दृष्टींनी सर्वात मोठा असलेला ब्राझील या 'पिंक टाइड'मध्ये येण्यानं जागतिक स्तरावर प्रागतिक आणि डाव्या शक्तींना बळ मिळेल. या घोडदौडीला थोपविण्याचाही प्रयत्न तितक्याच तीव्रतेनं होईल अशी अपेक्षा आहे. यासाठी ब्राझीलची लढत महत्त्वाची आहे. अखेर हा प्रवृत्तींमधला झगडा आहे.

तरीही राजकीय निरीक्षकांना धाकधूक आहे. जर बोल्सोनारो हरले आणि लूला निवडून आले तर हा निकाल बोल्सोनारो मान्य करतील का? 'इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबद्दल आपल्याला शंका आहे; त्यामुळे मतदान योग्य तऱ्हेने होणार नाही..' असं त्यांनी आतापासूनच सांगायला सुरुवात केली आहे. शिवाय बोल्सोनारोंचे लष्कराशी असलेले अनेक वर्षांचे संबंध लक्षात घेता त्यांचा वापर करून ते लष्करी कट घडवून आणतील काय अशी दुसरी एक काळजी सर्वांच्या मनात आहे.



# ग्रामीण रुग्णालय कंधार येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानास सुरुवात

कंधार: महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग,नांदेड जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर व ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सूर्यकांत लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाचे कार्यक्रम प्रभावीपणे राबिविण्यात अग्रेसर असलेले ग्रामीण रुग्णालयात आज दिनांक:-27/09/22 रोजी "माता सुरक्षित तर घर सुरक्षित "हे अभियान दिनांक 26 सप्टेंबर 2022 ते 05 आक्टोबर 2022 पर्यंत नवरात्रोत्सव करण्यात येत आहे.या शुभ मुहूर्तावर ग्रामीण रुग्णालय कंधार येथे सौ.आशाताई शिंदे (शे. का. प. च्या महिला प्रदेश अध्यक्ष ) यांच्या हस्ते मोहिमेचे फित कापून उदघाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. सौ.आशाताई शिंदे यांनी महिलांना असणाऱ्या आजार विषयी माहिती सांगण्यात आली व त्यांना शक्यतो फळे व पाले भाज्या नियमितपणे आहारात समावेश असावा त्यामुळे महिला स्ट्रॉंग राहतील असे मनोगत व्यक्त केले "माता सुरक्षित तर घर सुरक्षित"या अभियान विषयी माहितीचे वाचन व कार्यक्रमाचे प्रस्तावित डॉ. शाहीन बेगम (राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम महिला वैद्यकीय अधिकारी) यांनी केले व वैद्यकीय अधिक्षक डॉ.



सूर्यकांत लोणीकर यांनी महिलांना आरोग्य बद्दल माहिती सांगुण मार्गदर्शन केले व सर्व जनतेनी या सुवर्ण संधीचा फायदा घ्यावा महिलांनी आरोग्य तपासण्या करून घेण्याचे असे आवाहन केले. ग्रामीण रुग्णालय कंधार येथे महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच सौ.चित्राताई गोरे (भाजपा जिल्हा महिला अध्यक्ष) यांनी महिलांच्या समस्या समक्षिकरण ऍनिमिया मुक्त भारत महिलांनी आपल्या नियमितपणे तपासण्या करून घाव्यात असे आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती नरवाडे एस बी (कोषागार अधिकारी) ,सौ.अँड.मयुरी पदमवार,वर्षा कुलकर्णी (महिला अधीक्षक रामनाईक तांडा) तसेच रेखा गोरडवार पत्रकार , ज्ञानेश्वर चोंडे (कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती), शेरूभाई( शेकाप अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष )
अवधूत पेटकर, अँड कलीम अन्सारी यांचे स्वागत करण्यात आले. सौ सुषमा पागे गरोदर स्त्री व सौ.रेणुका देवकांबळे माता यांची नवजात बालिका यांचे स्वागत सौ.चित्ररेखा गोरे (भाजपा जिल्हा महिला अध्यक्ष) यांच्या हस्ते पुष्पगुच्छ स्वागत करण्यात आले. सदरील अभियानात 18 वर्षावरील सर्व महिला गरोदर माता,यांची सर्व महिलांची वैद्यकीय आरोग्य तपासणी ( रक्तदाब स्क्रीनिंग, मधुमेह, स्क्रीनिंग,हिमोग्लोबिन स्क्रीनिंग,दंतचिकित्सा स्क्रीनिंग रक्तक्षय स्क्रीनिंग तसेच कर्करोग स्क्रीनिंग.30 वर्षावरील सर्व महिला व बालकांचे लसीकरण प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत .सदरील कार्यक्रमा चे अभियान राबवित असल्याबाबत श्रीमती. आशाताई शिंदे व चित्राताई गोरे उपस्थितानी डॉ.सूर्यकांत लोणीकर व ग्रामीण रुग्णालयामधील अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले.

यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.महेश पोकले या रुग्णालयाचे सक्षम कार्यवाहक डॉ.राजू टोम्पे (स्त्री रोग तद्ध) डॉ. पोरे रविकिर, डॉ. संतोष पदमवार(दंतशल्य चिकित्सक) ,
डॉ. नम्रता ढोणे (रा बा स्वा का महिला वैद्यकीय अधिकारी),डॉ. प्राजक्ता बंडेवार,डॉ. निखहत फातेमा (आयुष्य वैद्यकीय अधिकारी) ,डॉ. मोरे एस. एस. डॉ. अरुनकुमार राठोड, डॉ. गजानन पवार (रा बा स्वा का वैद्यकीय अधिकारी) या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. डी. एल.गुडमेवार तर आभार प्रदर्शन डॉ. संतोष पदमवार यांनी केले.यावेळी ग्रामीण रुग्णालय कंधार येथे पत्रकार बांधव आणि ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नवीन औद्योगिक वसाहतीमुळे तालुक्याच्या विकासाला गती येणार -माजी मंत्री विनायकराव पाटील



चाकुर ता.प्रः- महाराष्ट्र राज्यात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर मंत्रीमंडळाच्या बैठकीत चाकुर येथील बहुचर्चित एमआयडीसीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी देण्यात आली.चाकुरात भुसंपादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निधीची तरदुद केली असुन आगामी काळात औद्योगिक वसाहतीसाठी एक हजार हेक्टर क्षेत्र भुसंपादन करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करुन चाकुर तालुक्याच्या विकासात गती आण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची माहिती माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी चाकुर येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा याहेतुने 2019 मध्ये या भागात औद्योगिक क्षेत्र करण्यासाठी भरपुर प्रयत्न केले होते.जागा निश्चित करुन नामपलकांचे अनावरणाचा सोहळा सुध्दा झाला होता.आचारसंहिता लागु झाली.औद्योगिक वसाहातीचे काम रडखडले.
राष्ट्रीय महामार्गा जवळ औद्योगिक वसाहतीसाठी शेतकऱ्यांची जागा देण्यास सहमती आहे.रेल्वेमार्ग,साठवण तलाव जवळ असल्यामुळे एमआयडीसी चांगल्या प्रकारे विकसित होणार आहे.नवनवीन उद्योग धंदे,कंपन्या,बेरोजागर तरुणासाठी रोजगार निर्मिती साठी योग्य संधी मिळणार आहे.जवळपास सर्व सुविधा येथे मिळणार आहेत.चाकुर तालुक्याच्या विकासात एमआयडीसीमुळे भर पडणार आहे.नव्याने स्थापन झालेल्या शिंदे-फडणवीस सरकारने औरंगाबाद येथे चाकुर येथील औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी भरीव निधीची आर्थिक तुरतुद करण्यात आल्याची घोषणा केली आहे.यामुळे पुन्हा चाकुर औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने औद्योगिक क्षेत्र विकासाला चालना मिळणार आहे.भुसंपादन करण्यासाठी गती मिळणार असल्याची माहीत माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी दिली.कामास लवकर यावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांची भेट घेऊन पाठपुरावा केला असल्याचे सांगितले.
जनतेच्या विकासाठी आवश्यक असलेल्या पायाभुत सुविधांचा विकासाची कामे सुरू ठेवली म्हणून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पत्रकार परिषदेत विनायकराव पाटील यांनी आभार मानले.यावेळी माजी आ.बब्रुवान खंदाडे,नगरसेवक अमिमन्यु धोंडगे, मेघराज बाहेती,प्रशांत पाटील,संतोष माने,गोविंद गिरी,सिध्देश्वर पवार,अशोक वाकळे,आदी उपस्थित होते.

# कॉम्रेड शहीद भगतसिंग युवा क्रांतीचा प्रणेता

आज २८ सप्टेंबर शहीद भगतसिंग यांची जयंती. ज्वाजल्य क्रांतीने प्रेरित झालेला हा युवक देशात क्रांती घडवून आणण्यासाठी वयाच्या 23 व्या वर्षी फासावर गेला. अश्या प्रखर क्रांतिकारकांचा युवकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या क्रांतीच्या युवा प्रणेत्याचा, त्याच्या क्रांती कार्याचा आढावा घेणे खूपच आवश्यक आहे.
ते म्हणतात की, " क्रांती म्हणजे पिस्तूल आणि बॉम्ब उपासनेचा पंथ नव्हे तर अपार अन्यायावर आधारलेली प्रचलित व्यवस्था बदलणे, क्रांती म्हणजे मानवी विकासाच्या मार्गातील सर्व अडसर दूर होणे आणि सर्वहाराच्या सार्वभौम सत्तेखाली एका जागतिक संघाच्या माध्यमातून भांडवलशाहीच्या गुलामगिरीतून आणि साम्राज्यवादी युद्धाच्या विनाशातून मुक्त होणे. "

स्वतः भगतसिंह हे आत्तापर्यंतचे सर्वात मोठे नास्तिक असूनही ते धर्माची आवश्यकता नाकारत नाहीत.त्यांचा धर्मविषयक दृष्टीकोन अत्यंत वस्तुनिष्ठ , परखड पण सहानुभूतीपूर्ण आहे ते त्यांच्या पुढील वक्तव्यावरून जाणवते,

ते म्हणतात की " माझ्या स्वतःच्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे मी निश्चितपणे असे सांगू शकतो की गुप्त स्वरूपाच्या कार्यामध्ये माणूस सतत धोकादायकपणे आयुष्य जगत असतो ना आशा ना भय अशी बेवारसपणे सन्मानविरहित शोकगीताशिवाय येणाऱ्या मरनाला सदैव तयार राहण्यासाठी गरज असते तेव्हा वैयक्तिक मोह आणि इच्छा यावर मात करण्यासाठी माणसाजवळ असा गूढवाद (धर्म) हाच खरा मार्ग असतो आणि तो नीतिधैर्य टिकून धरतो ".

यावरून त्यांचा धर्मविषयक दृष्टीकोन



समजून येतो. यापुढे जाऊन त्यांचा धर्मविषयक दृष्टीकोन खूपच clear आहे. ते म्हणतात की सरंजामी भांडवली व्यवस्थेत धर्म हा सत्ताधाऱ्यांच्या हातातील हत्यार बनतो मात्र त्याच्या दुसऱ्या पैलूकडे ते दुर्लत्यांचा नाहीत.त्यावर आपले मत मांडताना ते म्हणतात की निसर्ग ऐतिहासिक प्रक्रिया आणि समाज यांच्या विषयीच्या शास्त्रीय समजेचा अभाव असल्यामुळे आणि स्वतःचे जीवन समाज व भवितव्य यावर नियंत्रण मिळविण्याचे सामर्थ्य नसल्यामुळे माणसांना आणि मानवी समाजाला धर्म आणि ईश्वराची गरज कशी गरज भासते व या संकल्पनांचा उदय कसा होतो याकडेही भगतसिंह लक्ष वेधतो. संकटात आणि दैन्य दुःखात जगणाऱ्या माणसांसाठी धर्मविषयक असे उपयुक्त मिथ बनते याची चर्चा तो करतो कदाचित भगतसिंह यांनी मार्क्सचा धर्माचा समाजक्रांतिकारी उगम आणि धर्म हा सर्वहारांचा प्राण आहे हे विधान वाचलेले असेल. भगतसिंह हे केवळ धर्माचे महत्व सांगून थांबत नाहीत तर ते धर्माची चिकित्सा करताना म्हणतात की धर्मामध्ये मुख्य तीन भाग आहेत त्यातील १) धर्माची सारतत्वे २) धर्माचे तत्त्वज्ञान ३) धर्मातील कर्मकांड परंपरारितीरीवाज . यातील यातील पहिले आणि दुसरे म्हणजे तत्वे आणि तत्वज्ञान यांना जर आपण अंधविश्वास आणि अंधश्रद्धा यांचे जोड देणारा असू तर असा धर्म आपण भिरकावून दिलेलाच बरा. आपण धर्म ही संकल्पनाच संपुष्टात आणावी आणि जर आपण धर्मातील तत्वे आणि तत्वज्ञान यांना जर स्वतंत्र विचारशक्तीची जोड देणार असू तर अशा धर्माचे आपण स्वागतच केले पाहिजे.

या सर्व विवेचनावरून असे दिसून येते की भगतसिंगांचा धर्मविषयक दृष्टिकोन हा वस्तुनिष्ठ , परखड तसेच सहानुभूतीपूर्वक आहे ते धर्माची चिकित्सा करताना केवळ यांत्रिक, तार्किक युक्तिवादाच्या मर्यादेत अडकून पडणारी चिकित्सा करीत नाहीत तर ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि मानसिक- सांस्कृतिक अंगाने चिकित्सा करतात. एकंदरीत त्यांच्या धर्मविषयक दृष्टिकोन अत्यंत वस्तुनिष्ठ परखड सहानुभूतीपूर्वक दिसतो ते धर्माला नाकारण्याची उथळ भूमिका घेत नाहीत.
आता पर्यंतच्या विवेचनावरून, मांडणीवरून आपण त्यांना एक सच्चा मार्क्सवादी , अव्वल देशप्रेमी, भारतीय सामाजिक बदलाचे मुद्दे क्रांतिकारी विचारात गुंफानारा दृष्टा क्रांतिकारक , साम्राज्यवादाविरुद्ध बिनातडजोड लढणारा आणि या उपखंडातील जनतेच्या आशावादाचा हुंकार आणि प्रेरणेचा तेजःपुंज भगतसिंह भारतीय युवा क्रांतीचा प्रणेता होता.
शाहिद भगतसिंह यांच्या जयंतनिमित्त विनम्र अभिवादन लाल सलाम..

**माधव दिगांबर सावंत**
**मराठा सेवा संघ**
**संभाजी ब्रिगेड**
**विर भगतसिंह विद्यार्थी परिषद वसमत**

# सौ. जवळगावकर यांच्या हस्ते महाआरती करून प्रसादाचे वितरण

हिमायतनगर (अनिल नाईक) प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी वाढोणा नगरीची कुलस्वामिनी माता कालिंका देवी मंदिरात नवरात्र उत्सवाला आजपासून सुरुवात झाली आहे. हिमायतनगर (वाढोणा) येथील नवसाला पावणाऱ्या माता कालिंका मंदिरात अश्विन शुद्ध प्रतिपदा घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर सकाळी १० वाजता कांता गुरु वाळके व साईगुरु बडवे यांच्या मधुर वाणीत हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आ.माधवराव पाटील जवळगावकर व त्यांच्या अर्धांगिनी यांच्या शुभ हस्ते मातेचा अभिषेक व अलंकार सोहळा थाटात संपन्न झाला. यावेळी महाआरती करून प्रसादाचे वितरण झाले, आगामी नऊ दिवस मंदिरात नवरात्रोत्सवाचे विविध धार्मिक - सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत अशी माहिती मंदिर कमिटीचे अध्यक्ष राजीव रामदिनवार व सचिव समाज मारावार यांनी दिली आहे.
गेल्या दोन वर्षाच्या कोरोना काळानंतर हिमायतनगर वाढोणा शहराची कुलस्वामिनी माता कालिंका मंदिरात धुमधडाक्यात नवरात्रोत्सव साजरा होणार आहे.

भोकर नगर परिषदेला मिळाले कार्याचे फळ केद्र सरकारच्या

# स्वच्छ सर्वेक्षण अभियानात राज्यात सातवा तर मराठवाड्यात प्रथम

भोकर( लतीफ शेख) मानवांचे जीवन निरोगी रहावे यासाठी स्वच्छता ही आवश्यक असल्याने अनेक महापुरुषांनी स्वतः त्यात सहभागी होऊन स्वच्छते संदर्भात जनजागृती चे कार्य केले केंद्र सरकार ने स्वच्छते बाबत पुढाकार घेऊन देशातील नागरिक वसाहतीमध्ये स्वच्छतेचे महत्व पर्यंत



जावे व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी पाहिलेले स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण व्हावे या उद्देशाने केंद्र सरकारने स्वच्छ सर्वेक्षण अभियान सुरू केले असून या अभियानात भोकर नगरपरिषदेला 2021_ 2022 चा पुरस्कार प्राप्त झाला असून भोकर नगर परिषद राज्यातून सातव्या क्रमांकावर आली असून मराठवाड्यातून प्रथमच क्रमांक तर राज्यात सातवा मिळवत आपल्या कार्याची राज्यात ओळख निर्माण केली 1 ऑक्टोंबर 2022 रोजी देशाची राजधानी दिल्ली येथे आयोजित एका कार्यक्रमात भारताचे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु च्या हस्ते भोकर नगरपरिषदेला सन्मानित करण्यात येणार आहे देशात स्वच्छतेचे महत्व लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारने 2016-2017 पासून स्वच्छ भारत अभियान सुरू केले आहे या अभियानाअंतर्गत देशातील महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायती यांनी वर्षभर राबविलेल्या स्वच्छता अभियानावर आधारित विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते स्वच्छ सर्वेक्षण 2021_ 2022 यासाठी करण्यात आलेल्या परीक्षणातून राज्यातील 23 नगरपालिकांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे यामध्ये भोकर नगरपालिका राज्यातून सातव्या क्रमांकावर तर मराठवाड्यातून प्रथम क्रमांकावर आली आहे एक ऑक्टोंबर रोजी दिल्ली येथील आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु देशातील विजेत्या नगरपालिकांना सन्मानित करण्यात येणार आहे या मिळालेल्या पुरस्कार बद्दल मुख्याधिकारी सौ. प्रियंका टोंगे सह तात्कालीन नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष यांच्यासह वर्षाच्या तिन्ही ऋतूमध्ये स्वच्छतेसाठी राबणाऱ्या नगरपरिषदेच्या स्वच्छाता दुतांचे सर्वत्र कौतूक होत आहे
भोकर नगरपालिकेला केंद्र शासनाकडून पुरस्कार मिळाल्याने मला खुप आनंद झाला आहे
शहरातील सर्व नागरिक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळेच हे सगळं शक्य झालं असून स्वच्छ सर्वेक्षण 2021- 2022 अंतर्गत भोकर नगर नगरपरिषदेला राज्यात सातवा तर मराठवाडा प्रथम क्रमांक पटकावला आहे

# डोंग्रज येथे १० लक्ष रुपये सिमेंट रस्त्याच्या कामांचे भुमिपुजन

चाकुर ता.प्रः-जनसुविधा योजने अंतर्गत चाकूर तालुक्यातील मौजे डोंग्रज येथे मंजूर करण्यात आलेल्या १० लक्ष रूपयांच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचा भूमीपूजन समारंभ चाकूर अहमदपूर तालुक्यातचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे गटनेते मंचकराव पाटील यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव वाघ यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.याप्रसंगी त्यांचा संयोजकाकडून सत्कार करण्यात आला.
यावेळी चेअरमन लक्ष्मणराव घुमे,ज्येष्ठ नेते अनुप देशपांडे,जि प माजी सदस्य माधवराव जाधव,सुदर्शन मुंडे,तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे,काँग्रेस तालुकाध्यक्ष विलासराव पाटील चाकूरकर,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गंगाधरअप्पा आक्कानवरु,सामाजिक न्याय सेलचे विष्णू तिकटे,काँग्रेस नेते संतोष पाटील शेळगावकर,अनिल वाडकर,शिवदर्शन स्वामी,बिलाल पठाण,समाधान जाधव,सचिन तोरे,नामदेव नितळे आदीसह डोंग्रज येथील ग्रामस्थ,कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे राज्य अधिवेशनाची लवकरच बैठकीची घोषणा.!

नांदेड:- (प्रतिनिधी) राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या माध्यमातून राज्यात वृत्तपत्र , पत्रकार, पत्रकारांच्या समस्या, पोर्टल, यु-ट्युब चॅनल, यांना (७ . व्या राज्यस्तरीय ) अधिवेशनात मुख्यमंत्री ना- एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल . असे राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे - राज्य प्रदेशध्यक्ष - श्री. विजयकुमार व्हावळ यांनी व मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष श्री. अशोक दादा वायवळ यांनी प्रसिद्धीस पत्राद्वारे कळविले आहे.

७ व्या राज्यस्तरीय अधिवेशन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना- एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार आहे. संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष -विजय सुर्यवंशी, महाराष्ट्र राज्य प्रदेशध्यक्ष श्री. विजयकुमार व्हावळ , राज्य सल्लागार. बाळासाहेब खंडागळे, राष्ट्रीय महासचिव. विनोद पवार, महाराष्ट्र राज्य प्रदेशध्यक्ष विजयकुमार व्हावळ, राज्य



कार्याध्यक्ष प्रा. दशरथ वैजनाथ रोडे, राज्य संघटक, भागवत वैद्य. युवराजसिंग राजपूत राज्य प्रदेशध्यक्ष सौ. मणिषाताई पवार , राज्य संघटक - डॉ. गोपाळराव लाड,राष्ट्रीय सल्लागार - सुभाष बिंदवाल प्रदेशाध्यक्षा. सुनिता तोमर, संतोष जाधव, ज्योती खिलारे , प्रेमलता जाधव राज्य निरीक्षक संतोष जाधव कु- तेजश्री विसपोते. बाळासाहेब बागुल, मणिषाताई पवार. यांच्यासह वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत लवकरच भेट घेणार आहेत

७ व्या राज्यस्तरीय संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री- विजय सुर्यवंशी , महाराष्ट्र राज्य प्रदेशध्यक्ष विजयकुमार व्हावळ यांनी राज्यस्तरावर आणि राज्यस्तरीय अधिवेशनाची जोरदार तयारी करण्यासाठी विविध समित्या, विविध बैठका, विभागीय, जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय बैठक घेऊन वरिष्ठांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली सभासदांनी संपर्कात राहून अधिवेशनाची तयारी करण्यासाठी बैठक घेऊन वरिष्ठांना कळवावे. असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आले.

# माता सुरक्षित तर घरं सुरक्षित - नगरसेविका सौ. गोदावरीताई सुर्यवंशी.

लोहा प्रतिनिधी
माता सुरक्षित तर घरं सुरक्षित या कार्यक्रमाचे उद्धाटन लोहा नगरपालिकेच्या नगरसेविका सौ गोदावरी गजानन सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले या कार्यक्रमाचे अध्यक्ष लोहा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अब्दुल बारी सर होते यावेळी सुप्रियाताई सूर्यवंशी श्री सचिन सूर्यवंशी उपस्थित होते तसेच लोहा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सौ शितल पानझडे डॉक्टर रुबी सय्यद मॅडम डॉक्टर पूर्वा सरकार मॅडम डॉक्टर सारिका शेख मॅडम डॉक्टर प्रशांत जाधव डॉक्टर गणेश चव्हाण डॉक्टर दिनेश राठोड व सर्व कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर दीपक मोटे यांनी केले प्रस्ताविक डॉक्टर लोहारे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री मोरे यांनी केले यावेळी यावेळी उद्धाटनपर कार्यक्रमात बोलताना सो गोदावरीताई सूर्यवंशी या म्हणाल्या माता सुरक्षित असतील तरच घर सुरक्षित असते व महिला घरची सर्व जिम्मेदारी सांभाळून स्वतःला सांभाळून पूर्ण घर सांभाळण्याचे काम करत असते महिलांच्या जबाबदाऱ्या काय असतात महिलांना अडचणी काय असतात यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले यावेळी डॉ पाटील यांनी शिबिरामधून सर्व महिलांनी आपली आरोग्य तपासणी करून व उपचार करून या शिबिराचा फायदा घेण्याचे सांगितले आहे तसेच या शिबिराचा फायदा सर्व लोहा शहरातील व परिसरातील महिलांनी घ्यावा असे आव्हान केले व त्यांनीं स्वतःची व आपल्या परीवाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला लोहा शहरातील महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती

# शिवसमर्थ शिक्षक व कर्मचारी पतसंस्थेचे कार्य प्रशंसनीय : व्यंकटराव पा.गोजेगावकर

मुखेड / प्रतिनिधी

जागरुक आदर्श नागरीक तथा राष्ट्र निमिर्तीसाठी शिक्षकांची भुमिका महत्वपूर्ण असते. शिक्षण क्षेत्रात काम करण्यासाठी भाग्य असावे लागते. तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी प्रत्येक कला आत्मसात करुन शैक्षणिक क्षेत्रात नांदेड पॅटर्नचा आदर्श निर्माण करावा. जिल्हा परिषदेचे शिक्षक शैक्षणिक कार्यात अग्रेसर असतात याचा उत्तम उदाहरण मुखेड शहरातील जिल्हा परिषद मुलिंची शाळा आहे. जिथे हजारो विद्यार्थीनी शिकत आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षक बांधवांनी सुरु केलेल्या शिवसमर्थ शिक्षक व कर्मचारी पतसंस्था आज नावारूपास आली असून पतसंस्थेचे कार्य प्रशंसनीय आहे असे प्रतिपादन माजी शिक्षण सभापती तथा जेष्ठ नेते व्यंकटराव पा.गोजेगावकर यांनी केले.




शहरातील शिवसमर्थ शिक्षक व कर्मचारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२४ रोजी जिल्हा परिषद मुलींचे हायस्कूल सभागृहात संपन्न झाली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गोजेगावकर बोलत होते. चेअरमन दिलीपराव देवकांबळे व सहकाऱ्यांच्या संकल्पनेतून याकार्यक्रमात ३० आदर्श शिक्षकांना शिक्षकरत्न पुरस्कार , गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सेवापुर्ती शिक्षकांचा निरोप , राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपाचे जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष समर्थ कदम, डॉ. झरीकर , शिक्षण विस्तार अधिकारी कैलास होनधरने, विठ्ठलराव वडजे, शिक्षक संघटना जिल्हा नेते भागवत पाटील, बंडू पाटील, संतोष अंबुलगेकर , जिल्हा पतसंस्थेचे सचिव नीळकंठ चौंडे, व्यंकटराव गंदपवाड, सोनट्टके, तुळशीराम दादा , माजी गटशिक्षणाधिकरी व्यंकटराव माकणे, मुख्याध्यापक एम.आर. कांबळे, राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक गोविंद चव्हाण , मोहनावती पतसंस्थेचे चेअरमन अशोक चव्हाण, छत्रपती पतसंस्थेचे चेअरमन नामदेव पाटील, केंद्र प्रमुख मधुकर गायकवाड , गजानन पाटिल, श्रीपती वाडीकर व गजानन पवितवार यांची उपस्थिती होती . हा कार्यक्रम यशस्वी संपन्न करण्यासाठी पतसंस्थेचे चेअरमन दिलीप देवकांबळे , सचिव नामदेव धनगे, उपाध्यक्ष उत्तम राठोड , खजिनदार सूर्यकांत दासरवाड , बालाजी पाटील , बाबूराव डुमणे , सुभाष दिग्राकर , कडकंजे चंद्रकांत , बबिता घेर , शामला गाजले यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवाजी कराळे तर आभार वसंत शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# लोहा पोलिस ठाणे हद्दी अंतर्गत 65 दुर्गादेवी मंडळांनी केली प्रतिष्ठापना



#शहरात ३८ तर ग्रामीण मध्ये २७ ठिकाणी दुर्गा माता प्रतिष्ठापना#

लोहा,(प्रतिनिधी)

लोहा शहरासह हद्दीत शारदीय नवरात्रौत्सवास दि.२६ रोजी सोमवारी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला असून ढोल ताशांच्या गजरात दुर्गा देवीची प्रतिष्ठापना मंडळांनी केली आहे. लोहा पोलिस ठाणे हद्दी अंतर्गत ३९ गावे व ३ तांड्याचा समावेश आहे. ठाणे हद्दी अंतर्गत एकूण ६५ मंडळांनी दुर्गा देवीची प्रतिष्ठापना केली असून त्यात शहरी भागात ३८ तर ग्रामीण भागात २७ ठिकाणी देवीची प्रतिष्ठापना करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

कोरोनाचे निर्बंध पूर्णपणे हटविल्या नंतर पहिल्यांदाच मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात गत दोन वर्षाचा कालखंड वगळता प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी विविध सण उत्सव साजरे करण्यात येत आहेत. दि. २६ रोजी सोमवारी सकाळपासून दुर्गादेवी भक्त मंडळींनी देवीच्या आगमनाची पूर्वतयारी करून दुर्गादेवीची सवाद्य मिरवणूक काढून ढोल ताशांच्या गजरात देवीची विधिवत पूजा अर्चा करून प्रतिष्ठापना केली. लोहा पोलिस ठाणे हद्दीत जवळपास ३९ गावे व ३ तांड्याचा समावेश आहे. त्यामध्ये एकूण ६५ ठिकाणी दुर्गादेवी ची प्रतिष्ठापना करण्यात आली. शहरी भागात विविध ठिकाणी एकूण ३८ दुर्गादेवीची प्रतिष्ठापना करण्यात आली.त्यापैकी २० मंडळांनी परवानगी घेतली तर १८ मंडळे विनापरवानगी ची आहेत. तर ग्रीन भागात एकूण २७ ठिकाणी दुर्गादेवी ची घटस्थापना करण्यात आली त्यापैकी १८ परवाना धारक आणि ९ विना परवाना मंडळांनी देवीची प्रतिष्ठापना केली आहे.

नवरात्रोत्सव कालावधीत लोहा पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये एकूण ३ पोलिस अधिकारी, २१ पोलिस कर्मचारी तर २५ गृहरक्षक दलाचे जवान तैनात करण्यात आले असल्याची माहिती लोहा पोलिस ठाण्यातील गोपनीय शाखेकडून मिळाली.



## देगलूर महाविद्यालयाचा मुलांचा संघ प्रथम पारितोषिक

देगलूर: प्रतिनिधि

दि.27/09/2022 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व स्वामी विवेकानंद महाविद्यालय,शिरूर ताजबंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ब विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयास मुलांचा संघास सलग दुसऱ्या वर्षीही प्रथम पारितोषिक प्राप्त झाले आहे.या संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ.निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रा.वावधाने दीपक,प्रा.हाके सिताराम,श्री. मधुकर कांबळे यांचा सहकार्य लाभले आहे. या संघात प्रतिनिधित्व करणारे देगलूर महाविद्यालयतील खेळाडू,विलास पोकर्ने, अश्वजीत वाघमारे,हळदे सुधीर,सिद्धार्थ सोनकांबळे,गायकवाड प्रमोद,सुमेध सोनकांबळे यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.यांचे अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव श्री शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष श्री नारायणराव मैलागीरे, सहसचिव श्री सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष श्री विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य श्री राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार , श्री देवेंन्द्र मोतेवार ,श्री गंगाधर जोशी, श्री जनार्दन चिद्रावार, श्री रवींद्र अप्पा द्याडे. श्री चंद्रकांत प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उप प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उप प्राचार्य श्री निवृती गोविंदवार , लोकप्रशासन विभागप्रमुख तसेच प्रसिद्धी प्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक श्री गोविंद जोशी यांनी आभिनंदन केले आहे.

## अखिल भारतिय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या युवक प्रदेश ऊपाध्य पदि छोटु पाटील बाभळीकर

धर्माबाद प्रतिनिधि

अ.भा.भ्र.नि.सं ब्रिक्स मानव अधिकार समितीची बिलोली येथे जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली अखिल भारतिय भ्रष्टाचार निर्मुलन समिती तथा ब्रिक्स मानव अधिकार मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पदाधिकारी व कार्यकर्ता आढावा बैठक राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप पाटील खंडापुरकर यांच्या प्रमुख उपस्थित दि.२२ सप्टेंबर गुरुवार रोजी बिलोली ते बोधन राज्य महामार्गा वरील साईबाबा मंदिर प्रांगणात विविध विषयावर सविस्तर चर्चा व मार्गदर्शनानी उत्साहत संपन्न झाली.

## मातंग समाजाच्या न्याय हाकासाठी लोहा/कंधार मध्ये समाजाशक्ती दाखवणार - दाढेल

लोहा प्रतिनिधी

लोहा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे मानव हित लोकशाही पक्षाची नुकतीच बैठक





संपन्न झाली

मानव हित लोकशाही पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय सचिन भाऊ साठे यांच्या आदेशानुसार ही बैठकीत घेण्यात आली असुन लोहा/कंधार मधल्या मातंग समाजाच्या अन्याय अत्याचाराच्या बाबतीत व मातंग समाजाच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली असून येणाऱ्या काळात शासन दरबारी समाजाचे विविध प्रश्न मांडण्यासाठी युवकांची मोठ्या प्रमाणात मानव हित लोकशाही पक्षाची मोठी बांधणी करण्यात येणार आहे.

तसेच या बैठकीत नुतन तालुका लोहा कार्यकारणी व कंधार तालुका कार्यकारणी निवडी करण्यात आलेल्या आहेत.या बैठकीला प्रमुख उपस्थिती म्हणून नांदेड जिल्ह्याचे अध्यक्ष मालोजीराजे वाघमारे, प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा महिला उपाध्यक्ष सुखमलाताई वाघमारे, किशोर कवडीकर जिल्हाध्यक्ष उत्तर नांदेड, राधाताई जांभळे महिला जिल्हाध्यक्ष नांदेड, जिजा ताई नामपल्ली जानापुरीकर तालुका अध्यक्ष लोहा, आनंदा डाकोरे तालुकाध्यक्ष धर्माबाद, मिलिंद वाघमारे तालुका उपाध्यक्ष पालम, अविनाश वाघमारे जिल्हा मीडिया प्रमुख नांदेड, आकाश घोडजकर कंधार,राहुल भिसे लोहा, किरण दाढेल, रामदास डुबूकवाड, सोशल मीडिया प्रमुख , सर्व मानवहित लोकशाही पक्षाचे पदाधिकारी व लोहा कंधार मतदार संघातील मातंग समाजाचे युवक मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित होते. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी व युवकांनी मानव हित लोकशाही पक्षांमध्ये प्रवेश केला या वेळी लोहा तालुका कार्यकारणी निवड करण्यात आली.

बळीराम वाघमारे डोंगरगावकर, लोहा तालुका अध्यक्षपदी तर शिवहार गालफाडे, यांची उपाध्यक्षपदी तर लोहा तालुका संपर्कप्रमुख दयानंद डुंबे यांची निवड करण्यात आली.आणि

कंधार तालुका अध्यक्षपदी विठ्ठल दूध कावडे, तर संदीप लुंगारे कंधार तालुका उपाध्यक्षपदी, पदी निवड झाल्या. लोहा सचिव गणेश कंधारे, कार्याध्यक्ष सुखदेव बंडेवार, संघटक संग्राम नेकाले, सल्लागार सुरेश दादा डुबे, लोहा शहराध्यक्ष ज्ञानेश्वर दाढेल, युवक तालुकाध्यक्ष आकाश जाधव, सदस्य ऋतिक भिसे सदस्य प्रभाकर दाढेल, सदस्य तुकाराम दाढेल,किरणं वाघमारे पेनुकर,केशव वाघमारे, नरेंद्र गायकवाड, प्रदिप कांबळे, माधव लोंढे, श्याम दाढेल, युवा नेते छोटूभाऊ दाढेल,या कार्यक्रमाचे संचालन आंबेसागवीचे सरपंच दयानंद दुबे, यांनी केले व या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र ग्रामीण बँककडून श्री रेणुका मंदिराला सिटिंग बेंचेस भेट



श्रीक्षेत्र माहुर

घट स्थापनेच्या शुभ मुहूर्तावर महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा माहुरचे वतीने श्री रेणुकामाता मंदिराला ३ सिटिंग बेंचेस भेट देण्यात आले.

माहूरगड येथील देवी,देवतेचे दर्शन व श्री दत्तशिखर संस्थानचे प.पू. प. म. मधुसूदनजी भारती महाराज यांचे आशीर्वाद घेण्यासाठी परिक्रमा पौर्णिमा,नवरात्र, श्री दत्त जयंती ह्या तीन मोठ्या यात्रेत लाखो भाविक येथे येतात.दर पौर्णिमेलाही येथे दररोजच्या पेक्षा भाविकांची अधिक गर्दी असते. दर्शनार्थी भाविकांना बसण्याची सोय व्हावी म्हणून महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा माहुरचे व्यवस्थापक दिपंकर पाटील यांनी श्री रेणुकामाता मंदिर तिन सिटिंग बेंच भेट दिले.यावेळी विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव,अरविंद देव,कार्यालयीन व्यवस्थापक योगेश साबळे, बँक कर्मचारी गणेश सुर्वे व भुजंग राठोड उपस्थित होते.

## मुख्याध्यापक संघाच्या लोहा तालुकाध्यक्षपदी विलास नागेश्वर तर सचिव पदी खांडेकर

लोहा,(प्रतिनिधी)

लोहा शहरातील कै.विश्वनाथराव नळगे मा.व उ.मा. विद्यालयात नुकत्याच दि.(२६) रोजी पार पडलेल्या तालुका मुख्याध्यापक संघाच्या बैठकीत लोहा तालुकाध्यक्षपदी विलास नागेश्वर तर सचिव पदी बबनराव खांडेकर यांची निवड सर्वांनुमते जाहिर करण्यात आली.

सदरिल बैठकीस जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव मोहनराव फाजगे यांच्या अध्यक्षस्थानी तर अशोकराव पाटील,एकनाथराव मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा तालुका मुख्याध्यापक संघाची नूतन कार्यकारणी सर्वानुमते निवड करण्यात आली.




कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्ष -विलास नागेश्वर कै. विश्वनाथराव नळगे मा. व उ. मा. विद्यालय लोहा,उपाध्यक्ष - मधुकर पवार जय महाराष्ट्र विद्यालय पांगरी,उपाध्यक्ष-बोधगिरे डी.एस. श्री संत गाडगे महाराज विद्यालय लोहा,सचिव- बबनराव खांडेकर शरद पवार हायस्कूल चितळी,सहसचिव - सय्यद टी वाय माणिक आदर्श विद्यालय हाडोळी (ज.),कोषाध्यक्ष- एकनाथराव मोरे श्री साईबाबा हायस्कूल मारतळा,प्रवक्ता - केंद्रे एस.जे. नारायणा इंटरनॅशनल स्कूल लोहा.तर सदस्य म्हणून पाटील एस.बी. आप्पाराव पाटील विद्यालय सुनेगाव,हिलाल जी. एम.आबासाहेब पाटील विद्यालय लोहा,रावसाहेब सूर्यवंशी प्रतापराव पाटील विद्यालय हरसद पाटी यांची बिनविरोध सर्वांना मते निवड करण्यात आली.

तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांसह दामोधर वडजे,बेद्रे,सुर्यवंशी,सोनकांबळे,हिलाल,पांडूरंग पवार,धुळगंडे,लोंढे मॅडम,संजय फाजगे,मधूकरराव फाजगे सह नुतन कार्यकारीणीचे अभिनंदन केले.



लोहा - जागतिक फॉमासीस्ट दिना निमित्त डि.के.पाटील फॉमसी विद्यालयात आयोजित रक्तदान शिबीराचे फित कापुन उदघाटन करतांना संस्थेचे सचिव अवधुत क्षीरसागर,प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर , आडगांवचे पो.पा.क्षीरसागर व विद्यार्थी. छाया - विनोद महाबळे.




लोहा - डि.के.पाटील फार्मसी महाविद्यालयात आयोजित रक्तदार शिबीरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अजय क्षीरसागर यांनी रक्तदान केले यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिगंबर क्षीरसागर, सचिव अवधुत क्षीरसागर, दै.लोकमतचे तालुका प्रतिनिधी गोविंद पाटील कदम,पो.पा.क्षीरसागर , पत्रकार शिवाजी पांचाळ,इमाम लदाफ, बालाजी ढवळे, पत्रे आदीसह मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थीत होते. छाया - विनोद महाबळे.




लोहा - डि.के.पाटील फार्मसी महाविद्यालयात आयोजित रक्तदार शिबीरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिव अवधुत क्षीरसागर, यावेळी प्राचार्य डॉ.अजय क्षीरसागर ,संस्थेचे अध्यक्ष दिगंबर क्षीरसागर , दै.लोकमतचे तालुका प्रतिनिधी गोविंद पाटील कदम,पो.पा.क्षीरसागर , पत्रकार शिवाजी पांचाळ,इमाम लदाफ, बालाजी ढवळे, पत्रे आदीसह मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थीत होते. छाया - विनोद महाबळे.

## पत्रकार सिध्दार्थ कांबळे यांचा युवा पत्रकार पुरस्काराने सन्मान



जनतेचे मत न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी: सय्यद ईस्ताक अली

(कुंडलवाडी) बिलोली तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्रातून सर्वसामान्यांचे प्रश्न व त्यांना न्याय देण्याच्या भुमीकेतून सतत कार्यशील असलेले पत्रकार सिध्दार्थ कांबळे कुंडलवाडीकर यांचा या उत्कृष्ट कार्याबद्दल दैनिक युवाराजय परिवारातर्फे व आझाद फाउंडेशन संचलित आझाद ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ सप्टेंबर रोजी नांदेड नमस्कार चौक येथील गणराज पॅलेस येथे युवा पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक आझाद ग्रुपचे अध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे, प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार स्वामी, आजाद ग्रुपचे उपाध्यक्ष प्रमोद टाले, कोनाले कोचिंग क्लासेसचे संचालक योगेश कोनाले , दैनिक युवा राज्याचे संपादक अजित पाटील,आवृती प्रमुख प्रा.गणेश पाटील शिंदे या मान्यवरांची प्रमुख उपस्थितीती होती.










हे पत्र संपादक, मालक,प्रकाशक, मुद्रक सय्यद फेरोज यांनी मणियार ऑफसेट प्रिंटिंग प्रेस येथून छापून जनतेचे मत माझे मत, सोनार गल्ली, जामा मस्जिद मेन रोड, लोहा-४३१७०८ येथे प्रकाशित केले.
संपादक- फेरोज मणियार मो.८८८८०११३१३ E-mail -Jantechemat2015@gmail.com